**मे. ब्रम्हगव्हाण उपसा सिंचन योजना - ३ द्वारा गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद (गो.म.पा.वि.म.) अंतर्गत ब्रम्हगव्हाण उपसा सिंचन योजना — ३ जायकवाडी जलाशय, जुने लखमापूर गाव, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद, महाराष्ट्र या प्रस्तावित प्रकल्पाच्या दि. १४/१२/२०२१ रोजीच्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचा इतिवृत्तांत.**

...............

कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र. १ सिंचन भवन, औरंगाबाद यांच्या मार्फत प्रस्तावित प्रकल्प मे. ब्रम्हगव्हाण उपसा सिंचन योजना - ३ द्वारा गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद (गो.म.पा.वि.म.) अंतर्गत ब्रम्हगव्हाण उपसा सिंचन योजना — ३ जायकवाडी जलाशय, जुने लखमापूर गाव, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद, महाराष्ट्र या प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जन सुनावणी घेणे बाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दि. १३/१०/२०२१ रोजी सादर केला होता. सदर प्रकल्पामुळे गंगापूर तालुक्यातील एकुण ४० गावामधील सुमारे १०,००० हेक्टर क्षेत्र ओलीताखाली येणार आहे.

सदर प्रस्तावित प्रकल्प हा लघु पाटबंधारे विभाग क्र. १ सिंचन भवन, औरंगाबाद यांच्या मार्फत प्रस्तावित प्रकल्प मे. ब्रम्हगव्हाण उपसा सिंचन योजना - ३ द्वारा गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद (गो.म.पा.वि.म.) अंतर्गत ब्रम्हगव्हाण उपसा सिंचन योजना — ३ जायकवाडी जलाशय, जुने लखमापूर गाव, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद, महाराष्ट्र यांच्यामार्फत उभारण्यात येणार आहे.

मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी पर्यावरण विषयक जनसुनावणी दि. १४/१२/२०२१ रोजी दुपारी १२.३० वा. आयोजीत करण्यास मान्यता दिल्यानंतर मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (म.प्र.नि. मंडळ) यांचेकडून प्रस्तावित लोक सुनावणी संदर्भातील कार्यालयीन आदेश क्र. — E-११६ /२०२१ पत्र क्र. BO/JD(WPC)/PH/B-२१११२०३-FTS-०१२४ दिनांक ०३.१२.२०२१ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठीत करण्यात आली व मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी पत्र क्र. १०२० दि. १३/१२/२०२१ अन्वये अप्पर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना त्यांच्या वतीने सदर जनसुनावणीस प्राधिकृत केले आहे.

जाहिर जनसुनावणीस खालील समिती उपस्थित होती.

| | | |
|---|---|---|
| १) | डॉ. अनंत गव्हाणे,<br>अप्पर जिल्हाधिकारी, औरंगाबाद | मा. अध्यक्ष<br>लोक जनसुनावणी समिती |
| २) | डॉ. प्रवीण जोशी,<br>प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, औरंगाबाद | मा. सदस्य<br>लोक जनसुनावणी समिती |
| ३) | श्री. प्रदीप वानखेडे,<br>उप- प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, औरंगाबाद | समन्वयक<br>लोक जनसुनावणी समिती |

श्री. प्रदीप वानखेडे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, (म.प्र.नि. मंडळ) औरंगाबाद तथा समन्वयक, पर्यावरणविषयक जाहीर लोक सुनावणी समिती, औरंगाबाद यांनी सदरच्या (आजच्या) पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समितीचे अध्यक्ष श्री. डॉ. अनंत गव्हाणे, अप्पर जिल्हाधिकारी, औरंगाबाद उपस्थित असलेले महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद येथील प्रादेशिक अधिकारी, डॉ. प्रवीण जोशी, सदस्य, लोक सुनावणी समिती सदर लोक सुनावणीचे अर्जदार व कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र. १, सिंचन भवन, औरंगाबाद तसेच सदर जनसुनावणीस आवर्जुन उपस्थित असलेले मा. आ. प्रशांतजी बंब साहेब व उपस्थित असलेले सर्व संबंधित नागरिकांचे पर्यावरण विषयक लोक सुनावणीमध्ये स्वागत केले तसेच समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीला सुरुवात करण्यात आली. सर्व प्रथम समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी सूचित केले कि, भारत सरकारच्या वने व पर्यावरण तथा हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४.०९.२००६ व सुधारित दिनांक ०१.१२.२००९ रोजीच्या तसेच इतर अधिसूचनेनुसार विशीष्ठ प्रकल्पांना पर्यावरण विषयक संमती / अनुमती (Environment Clearance) घेणे बंधनकारक असून त्यापूर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी (Public Hearing) आयोजित करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

केंद्रीय पर्यावरण मंत्रालय / पर्यावरण वने व जल वायू परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार यांच्या १४ सप्टेंबर २००६ च्या अधिनियमाद्वारे व त्यांमधील त्यानंतरच्या सुधारणांच्या अनुषंगाने सदरील लोक सुनावणी आज आयोजित करण्यात आलेली आहे. सदरील अधिनियमांद्वारे जलाशयातुन उपसा सिंचन योजना शेतीच्या वापरासाठी उभारण्याकरिता संबंधित राज्य पर्यावरण मंत्रालय यांची पर्यावरण विषयक अनुमती (Environmental Clearance) / परवानगी प्राप्त करून घेणे बंधनकारक आहे. त्याचाच एक महत्वाचा भाग म्हणून पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी आज रोजी आयोजित करण्यात आलेली आहे.

कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र. १, सिंचन भवन, औरंगाबाद यांचा औरंगाबाद जिल्ह्यामधील मे. ब्रम्हगव्हाण उपसा सिंचन योजना - ३ द्वारे गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद (गो.म.पा.वि.म.) अंतर्गत ब्रम्हगव्हाण उपसा सिंचन योजना – ३ जायकवाडी जलाशय, जुने लखमापूर गाव, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद, महाराष्ट्र या प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जन सुनावणी घेणे बाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दि. १३/१०/२०२१ रोजी प्राप्त झाला होता. समन्वयक, लोक सुनावणी समिती यांनी कळविले कि, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेला प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणाऱ्या परिणाम बाबत

इत्यंभूत माहिती सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे तसेच प्रस्तावित प्रकल्पास बंधनकारक असणाऱ्या प्रदूषण नियंत्रण संयंत्रणा व त्या संबंधातील कायदे या बाबतची माहिती सामान्य जनतेस देण्यात येऊन जनतेमार्फत दिलेल्या सूचनांचा विचार करणे हा होय.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त लोक सुनावणी घेण्याबाबतचा अर्जाच्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचा परवानगीने दि. १४ डिसेंबर - २०२१ रोजी औरंगाबाद जिल्ह्यामधील उपरोक्त प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरणविषयक लोक सुनावणी घेण्याबाबत दिनांक निश्चित करण्यात आली होती. याबाबत नियमाप्रमाणे ३० दिवस अगोदर मे. ब्रम्हगव्हाण उपसा सिंचन योजना भाग-३, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद या पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीची सूचना दि. १२.११.२०२१ रोजीच्या मराठी वर्तमानपत्र " दैनिक सकाळ" व इंग्रजी वर्तमानपत्र "द टाइम्स ऑफ इंडिया" मध्ये प्रकाशित / प्रसिद्ध करण्यात आली होती. तसेच सदर मराठी जाहिरीतीचे शुध्दीपत्रक दि. १३/११/२०२१ रोजीच्या दै. सकाळ या मराठी वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आले होते. सदरील वर्तमानपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या जाहिरातीमध्ये औरंगाबाद जिल्ह्यातील मे. ब्रम्हगव्हाण उपसा सिंचन योजना भाग-३, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद या प्रकल्पाची पर्यावरणविषयक जाहीर लोक सुनावणी दि. १४/१२/२०२१ रोजी १२.३० वा. आरापुर, गट क्र. ३४, औरंगाबाद-मुंबई हायवेच्या दक्षिण दिशेस गवळी शिवरा रोड, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद येथे आयोजित केलेली असल्याबाबत सविस्तर वृत्त / सूचना प्रसिद्ध करण्यात आलेली होती. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कार्यालयामार्फत जाहीर लोक सुनावणीशी संबंधित दस्तऐवजांमध्ये पर्यावरणीय आघात मूल्यांकन अहवाल, कार्यकारिणी सारांश (मराठी व इंग्रजी), सी.डी. सह लोकांच्या माहितीसाठी / अध्ययनासाठी अधिसूचनेप्रमाणे शासनाच्या खालील कार्यालयामध्ये इच्छुक नागरिकांना अभ्यास / अध्ययनासाठी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

१. मा. जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद.
२. मा. कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र. १, सिंचन भवन, औरंगाबाद.
३. मा. जिल्हा व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, औरंगाबाद
४. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद.
५. मा. तहसिलदार, तहसिल कार्यालय गंगापूर, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद.
६. मा. गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, गंगापूर, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद.
७. ग्रामपंचायत कार्यालय, आंबेलोहळ, आरापूर, बोरगाव, भोयगाव, दिघी, देरडा, ढोरेगाव, डोमेगाव, दहेगाव, गवळी शिवरा, गजगाव, गोविंदपूर, घोडेगाव, गवळी धानोरा, जिकठाण, कनकोरी, खडकनारळा, काळेगाव, कासोडा, कोबापूर, मलकापूर, मिर्झापूर, मुरमी, नारायणपूर, नागापूर, नर्सापूर, पेंढापूर, प्रतापपूर, फूलशिवरा, पदमपूर, रामपूरी, राजूरा, सारंगपूर, सुलतनाबाद, सुलतानपूर (जिकठाण), शिरोडी, तुर्काबाद खराडी, वडगाव,

वसुसायगाव, येसगाव, लखमापूर, अमळनेर, गणेशवाडी, बाबरगाव, खायगव्हाण, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद.

८. उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, प्लॉट न. ए-४/१, एमआयडीसी, चिकलठाणा, औरंगाबाद.

९. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, प्लॉट न. ए-४/१, एमआयडीसी चिकलठाणा औरंगाबाद.

१०. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरू पॉईन्ट, ३ रा माळा, सायन माटूंगा स्कीम रोड नं.८, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व), मुंबई-२२.

११. मा. संचालक, पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई.

१२. मा. वरिष्ठ शास्त्रज्ञ, प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य विभाग, तळमजला, पूर्व विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर.

उप प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, औरंगाबाद यांनी दि. १४.१२.२०२१ रोजी १२.३० वाजता मा. अध्यक्ष, जाहीर लोक सुनावणी समिती, लोकसुनावणीचे सदस्य व उपस्थितांचे स्वागत करून लोक सुनावणीला सुरुवात केली. जाहीर लोक सुनावणीवेळी उपस्थित असलेल्या लोकांची यादी **(सहपत्र-२)** नुसार सोबत जोडली आहे.

प्रकल्प प्रवर्तक तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग क्र. १ सिंचन भवन, औरंगाबाद यांनी व त्यांचे तांत्रिक सल्लागार (Technical Consultant) डॉ. समीर देशपांडे यांनी औरंगाबाद जिल्ह्यामधील प्रस्तावित मे. ब्रम्हगव्हाण उपसा सिंचन योजना - ३ द्वारे गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद (गो.म.पा.वि.म.) अंतर्गत ब्रम्हगव्हाण उपसा सिंचन योजना – ३ जायकवाडी जलाशय, जुने लखमापूर गाव, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद, महाराष्ट्र या प्रस्तावित प्रकल्पाच्या लोकसुनावणीबाबत पर्यावरण विषयी बाबींच्या अनुसरून संपूर्ण मुद्देसूद सादरीकरण केले.

कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग क्र. १ सिंचन भवन, औरंगाबाद यांनी जाहीर लोकसुनावणी घेण्याबाबतचा उद्देश व त्याची कार्यपद्धती उपस्थितांना समजावून सांगितली. त्यानुसार या ठिकाणी (आज होत असलेल्या जाहीर लोक सुनावणीवेळी) पर्यावरणविषयक परवानगी प्रदान (issue) बाबतचा कोणताही निर्णय घेण्यात येणार नाही असे स्पष्ट केले. या जाहीर लोक सुनावणी दरम्यान घेण्यात येणाऱ्या आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन शासनास पाठविण्यात येईल व त्यास अनुसरून संबंधित शासन विभागाकडे (पर्यावरण मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई) या सर्व बाबी पर्यावरण विषयक अनुमती प्रदान करताना विचारात घेण्यात येतील. त्यामुळे, उपस्थित जनतेला या प्रकल्पाबाबत त्यांच्या सूचना, टीका, टिपण्णी, निवेदने व आक्षेप घ्यावयाचे असतील तर या ठिकाणी तोंडी अथवा लेखी मांडण्याबाबत उपस्थितांना

विनंती केली. या सर्व बाबींची नोंद घेतली जाईल व महाराष्ट्र शासनामधील संबंधित विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी (पर्यावरण मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई) पाठविण्यात येईल असे कळविले.

सादरीकरणानंतर समन्वयक यांनी लोकसुनावणीसाठी उपस्थित नागरिकांना या उपसा सिंचन योजनेबाबत त्यांचे मत, टीका-टिपण्णी, आक्षेप, सूचना मांडण्याबाबत आवाहन केले. तसेच यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे याबाबत एक सुचना ई-मेल द्वारे प्राप्त झाली असल्याचे सांगुन सदर सुचना प्रकल्प प्रवर्तकास योग्य त्या कार्यवाहीसाठी कळविले असल्याचे सांगितले.

लोक सुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिपण्णी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्प धारकाने (कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, क्र. १) / तांत्रिक सल्लागार ( लघु पाटबंधारे विभाग क्र. १ यांनी नियुक्त केलेले) यांनी दिलेली उत्तरे / आश्वासने खालील प्रमाणे आहेत:-

डॉ. श्री. अनंत गव्हाणे, मा. अध्यक्ष, लोकसुनावणी समिती व श्री. प्रदिप वानखेडे, समन्वयक यांनी सर्व संबंधितांना प्रश्न, आक्षेप, सूचना, तक्रारी असल्यास निदर्शनास आणून द्याव्या असे कळविले.

**१. श्री संतोष पाटील जाधव माजी बांधकाम सभापती तालुका गंगापूर-**

आज या ठिकाणी आमच्या सर्व शेतकऱ्यांच्या शेतीच्या, सिंचनाच्या आणि पिण्याच्या पाण्याच्या या महत्त्वाच्या जीवन-मरणाच्या प्रश्नावर मा. आमदार श्री प्रशांतभाऊ बंब यांच्या संकल्पनेतून साकारणारा हा ब्रम्हगव्हाण उपसा सिंचन योजना क्र. ३ हा प्रकल्प जायकवाडी लघु पाटबंधारे प्रकल्प क्र.१ च्या प्रस्तावित योजनेतून आणि आज या ठिकाणी या योजनेसाठी जी शेवटची अट जरी म्हटले तरी या ठिकाणी ते वावगे ठरणार नाही अशी पर्यावरणाची ही परवानगी आहे. आणि ही परवानगी मिळाल्यानंतर आमच्या या ४० गावाचा विषय निकाली लागणार आहे म्हणून आज या ठिकाणी पर्यावरण विषयक जाहिर लोक सुनावणी याठिकाणी प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ श्री जोशी साहेब, अप्पर जिल्हाधिकारी श्री अनंत गव्हाणे साहेब त्याचप्रमाणे उप प्रादेशिक अधिकारी श्री वानखेडे साहेब यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये आणि आमच्या गंगापुर तालुक्याच्या वतीने आणि मा. आमदार यांच्या मार्गदर्शनाने आज गवळीशिवरा आरापूर या ठिकाणी होत आहे या ठिकाणी आमच्या सर्वांच्या मनामध्ये या योजनेविषयी ज्या शंका होत्या जे आम्हाला आश्चर्य वाटत होते त्या आपण खऱ्या अर्थाने या प्रकल्पामध्ये आमच्या मनातील शंका अंतर्भूत केल्यामुळे माझी स्वतःची खात्री पटली आहे पर्यावरणाच्या आजच्या या लोक सुनावणीमध्ये आमच्या शेतकऱ्यांचे कोणतेही नुकसान होणार नाही उलट फायदाच होणार आहे हे आपण श्री देशपांडे साहेब यांनी

ठिकाणी सादरीकरण केले त्यामध्ये मला या ठिकाणी दिसून आले आम्हाला वाटत होते आमच्या या ठिकाणी जमिनी जातील आमची अडचण होईल येथील वडिलोपार्जित झाडे या ठिकाणी तोडली जातील अशा अनेक समस्या आमच्या डोळ्यासमोर उभ्या होत्या आपण सादरीकरणात सांगितले की, या ठिकाणी कोणत्याही वृक्षाची तोड होणार नाही कोणत्याही शेतकऱ्यांचे याठिकाणी नुकसान होणार नाही कोणत्याही शेतकऱ्याची जमीन या ठिकाणी संपादित करण्याची गरज नाही अशा भूमिकेत पाइपलाइनच्या माध्यमातून आमच्या ४० गावाच्या दहा हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार असल्याचे आपल्या प्रेझेंटेशन मधून दिसून आले म्हणूनच या ठिकाणी माझा तरी या ठिकाणी या योजनेस विरोध नाही. आणि माझ्या सर्व शेतकऱ्यांच्या वतीने या ठिकाणी विनंती करतो की आजच्या सुनावणीचा अहवाल तात्काळ शासनास सादर करावा आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची परवानगी आमच्या या प्रकल्पास मिळावी आमच्या पिण्याच्या व शेतीच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावावा. याबाबत या ठिकाणी सर्वांच्या वतीने जाहीर विनंती करतो याबाबत आम्हाला न्याय द्यावा आम्हाला सहकार्य करावे आम्हाला मदत करावी कारण आमचा गंगापुर तालुका मराठवाड्यामध्ये सातत्याने दुष्काळाच्या छायेत असलेला तालुका आहे. सातत्याने याठिकाणी अस्मानी-सुलतानी संकट आमच्या या तालुक्यावर येत असतात त्यामुळेच आमचे आमदार साहेब आठ-दहा वर्षापासून या योजनेसाठी लढा देत आहेत आणि ४० गावातील शेतकऱ्यांच्या पाठीला पाठबळ या ठिकाणी मिळत आहे. त्यामुळे आम्हाला या ठिकाणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची मान्यता देऊन हा प्रस्ताव शासनास सादर करून या प्रकल्पास मान्यता द्यावी हीच आमच्या सर्वांच्या वतीने विनंती करतो धन्यवाद.

**२. श्री प्रताप शिवनाथ पवार शेतकरी मौजे कनकोरी-**

या सभेच्या माध्यमातून आम्हाला याबाबत काही जास्त समजत नाही पण मी माझ्या भावना या ठिकाणी व्यक्त करतो. साहेब जवळच एम आय यडिसी आहे, प्रदूषण खूप होत आहे दरवर्षी ग्रामपंचायतीमार्फत वृक्ष लागवड करतो दरवर्षी एक हजार ते दीड हजार वृक्ष आम्ही या ठिकाणी लावतो पावसाळ्यात व हिवाळ्यात त्यांना जगवतो पण उन्हाळ्यात ही झाडे आमच्याकडून जगवल्या जात नाही माणसे जगवावीत की जनावरे जगवावीत अशी परिस्थिती या ठिकाणी उन्हाळ्यात निर्माण होत आहे पाणी नसल्याने आमच्या पूर्वजांनी लावलेली वृक्ष होती ते देखील वाळून गेली आहेत पर्यावरणासाठी वृक्षांची आवश्यकता आहे आणि त्यासाठी पाण्याची खूप आवश्यकता आहे पाणी असेल तर वृक्ष राहतील आम्ही वृक्ष लागवड खूप करतो पण उन्हाळ्यात झाडे टिकत नाहीत त्यासाठी अशी जर योजना लवकरात लवकर आली तर एमआयडीसीचा दुष्परिणाम लोकांवर होण्याअगोदरच थोडे पर्यावरण संतुलन देखील होईल अशी माझी

अपेक्षा आहे आणि जे पशुपक्षी आहेत उदाहरणार्थ कावळा तो देखील इथे सापडत नाही त्यामुळे एवढ्या प्रकल्पाबाबत मनावर घ्यावे म्हणजे आम्हाला सुख-शांती लाभेल, धन्यवाद.

**३. श्री कडुबा शेवाळे, माजी जिल्हा परिषद सदस्य, गजगाव-**

या ठिकाणी पर्यावरण विषयक जाहिर लोक सुनावणी होत आहे आणि अनेक वर्षाची लोकांची मागणी या परिसरामध्ये उपसा सिंचन योजना व्हावी आणि अनेक वर्षापासून दुष्काळाच्या खाईत पडलेली हे लोक अनेक वर्षापासून टँकरने पिण्याचे पाणी व शेतीला पाणी नाही अशा अवस्थेत जगणारा हा परिसर आणि या परिसरामध्ये मा. आमदार श्री प्रशांत भाऊ बंब यांच्या माध्यमातून एक संकल्पना त्यांनी मांडून या परिसरामध्ये पाणी यावे अशा प्रकारचा बराच दिवसांचा प्रयत्न त्यांनी सफल केला त्याबद्दल मी प्रथम त्यांना धन्यवाद देतो आणि आपण या ठिकाणी पर्यावरण विषयक लोक सुनावणी घेत आहात त्यामध्ये तुमचे जे काही उद्देश असतील ते उद्देश सफल करण्याकरिता व ते तुमच्यासमोर मांडण्याकरिता जनसुनावणी या ठिकाणी चालू आहे या ठिकाणी पर्यावरण विषयक बोलताना माझी एक सूचना या ठिकाणी राहणार आहे की लखमापूर ते येसगाव पर्यंत दुसरा टप्पा तुम्ही करणार आहात आणि तिसरा टप्पा हा आरापूर पर्यंत त्याचे नियोजन येथे होणार आहे माझे म्हणणे असे आहे आमदार साहेबांना आणि तुम्हाला सर्वांना की पर्यावरणाच्या माध्यमातून आपण जर विचार केला तर पूर्वी गायरान असायचे आणि गायनामध्ये खूप झाडे असायची आणि त्यामुळे पशुपक्षी याठिकाणी असायची आणि पर्यावरणाचा समतोल राहायचा परंतु आज अशी स्थिती आहे की, गायरान नाहीत झाडे नाहीत आणि मग पर्यावरणाची मोठी समस्या या परिसरामध्ये निश्चित खूप मोठी आहे या ठिकाणी पाच पन्नास एकर जागा घेऊन अभयारण्य जर करता आले तर ते या प्रकल्पामध्ये समाविष्ट करावं आणि मोठे अभयारण्य या पाण्यावर तयार होतील आणि पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही आणि त्याचा फायदा जनतेला होईल कारण प्रदूषण दिवसेंदिवस वाढत जाणार आहे याबाबत असे काही करता येईल काय असे प्रयत्न व्हावेत. येसगाव ते आरापूर या परिसरामध्ये या योजनेसोबत पाच -पन्नास एकर मध्ये अभयारण्य या योजनेसोबत करता येईल काय? याचा देखील विचार व्हावा अशी मी याठिकाणी विनंती करतो आणि आपण जी या ठिकाणी सुनावणी घेत आहात आणि आपण आम्हाला ज्या काही गोष्टी समजून सांगितल्या कशाचा परिणाम होणार आहे आणि कशाचा नाही, माती परीक्षण इत्यादी सगळयाच गोष्टी आपण समजून सांगितल्या त्याचा कुठलाही परिणाम आमच्यावर होत नाही कुणाचे स्थलांतरण होत नाही कोणाचे नुकसान होत नाही त्यामुळे हा प्रकल्प होतोय तो योग्यच आहे आणि आमच्या सर्व शेतकऱ्यांच्या वतीने मी हा प्रकल्प लवकरात लवकर व्हावा याबाबत विनंती करतो शासनाकडे मान्यतेसाठी लवकरात लवकर पाठवावा आणि

पर्यावरणाच्या ज्या काही अटी असतील त्याची पूर्तता करून शासनाची मान्यता घ्यावी आणि लवकरात लवकर ही योजना कार्यान्वित करावी थांबतो.

**यावर प्रकल्प प्रवर्तक श्री धनंजय गोडसे, कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र.१ यांनी नमुद केले कि -**

या प्रकल्पा बरोबर वृक्षलागवडीचे उद्दिष्ट मी कडुबा हिवाळे यांनी पाच-पन्नास एकरावर ती वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट त्यांनी सांगितले आहे पाच पन्नास एकरावर वृक्ष लागवड करता येणे शक्य आहे काय?

वृक्ष लागवडीसाठी जो काही आवश्यक खर्च आहे त्याच्या आमच्या प्रकल्प अहवालामध्ये त्याचा स्वतंत्रपणे हेड आहे त्या हेड खाली आम्ही निश्चितपणे वृक्षलागवडीची अंदाजपत्रकामध्ये आम्ही तरतूद करू पण त्यानंतर प्रकल्पाची सुरुवात होत असताना जमीन घेऊन त्यावर वृक्षलागवड करणे आम्हाला शक्य होणार नाही परंतु शासनाची ज्या ज्या ठिकाणी जमीन असेल गायरान सेल किंवा आपल्या प्रकल्पाच्या दृष्टीने ज्या ज्या ठिकाणी वृक्ष लागवड करणे शक्य होईल तसेच ग्रामस्थांच्या वतीने ज्या ज्या ठिकाणी आम्हाला आपणाकडून संमती दिली जाईल त्याचा ठिकाणी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट निश्चितपणे आम्ही साध्य करू.

**श्री जोशी साहेब, समिती सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांनी विचारले कि-**

३५ एकर जागा भाडेतत्त्वावर घेणार आहे?

**यावर प्रकल्प प्रवर्तक श्री धनंजय गोडसे, कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र.१ यांनी सांगितले कि -**

प्रत्यक्षात जमीन जी आम्हाला लागणार आहे जी आम्हाला संपादन करावी लागणार आहे ती फक्त सहा हेक्टर आहे आता ही भाडेतत्वावर जमीन घ्यायची म्हणजे कशी मला पंप हाऊस बांधून झाल्यानंतर मला पाईपलाईन टाकायची आहे पहिली पाईपलाईन २३ किलोमीटर आहे दुसरी १३ किलोमीटर आहे आणि मला जसा या प्रकल्पाला जलसंपदा विभागाकडून निधी उपलब्ध होईल त्याप्रमाणे या प्रकल्पाचे काम टप्प्याटप्प्याने होणार आहे आणि ही पाईपलाईन टाकत असताना कोणाच्या क्षेत्रांमधून जाणार आहे त्या ठिकाणी पिके उभी असतात आता मी त्यांना सांगू शकत नाही की तुम्ही पीक घेऊ नका परंतु माझं प्रत्यक्षात काम ज्यावेळी सुरू होईल त्या वेळेला त्या ठिकाणी जे पिकांचे नुकसान होणार आहे त्याची नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी

आमची आहे त्यावेळेला जमीन घेतली जाईल नुकसान भरपाई दिली जाईल जमीन लेवल केले जाईल व पुन्हा वहिवाटी साठी ताब्यात दिली जाईल.

**श्री जोशी साहेब, समिती सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांनी विचारले कि-**

ग्रीन बेल्ट विकासासाठी पुरेशी क्षेत्र सुरक्षित करण्यात आले आहे?

**यावर प्रकल्प प्रवर्तक श्री धनंजय गोडसे, कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र.१ यांनी सांगितले कि -**

६ हे. क्षेत्र लागणार आहे त्या व्यतिरिक्त कोणतेही क्षेत्र आपण घेणार नाही पण पंप हाऊस ज्या ठिकाणी आहे त्या ठिकाणी ग्रीन बेल्ट व पंप हाऊस करण्यात येईल कडुबा हिवाळे यांनी त्याप्रमाणे सांगितले त्याप्रमाणे वृक्षलागवड करण्यात येईल व ग्रीन बेल्ट तयार करण्यात येईल.

**४) श्री संतोष काळवणे, संचालक कृषी उत्पन्न समिती, लासुर स्टेशन, रा. गजगांव-**

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आपण ही जी पर्यावरण विषयक जाहिर लोक सुनावणी आज सर्वांसमोर ठेवली त्याबद्दल आम्ही तुमचे आभारी आहोत प्रथमतः आपल्या तालुक्याचे आदरणीय सन्माननीय आमदार प्रशांत भाऊ बंब यांनी सातत्याने पाच वर्षांपासून पाठपुरावा ते करत आहेत आणि ही योजना गंगापुर तालुक्यातील चाळीस गावांसाठी अत्यंत महत्त्वाची योजना आहे गंगापूर- वैजापूर हे तालुके सातत्याने अवर्षणग्रस्त तालुके आहेत आणि हा जो मधला बेल्ट आहे त्याला पाणी नसल्यामुळे G-४० मध्ये ही गावे दिलेली आहेत त्यांची भूजल पातळी अत्यंत कमी झालेली आहे आणि ही जलपातळी वाढवण्याकरिता या योजना अत्यंत गरजेच्या आहेत या योजनेपासून शेतकऱ्यांची कुठलेही नुकसान होणार नाही उलट त्याचा फायदाच होणार आहे आत्ताच हिवाळे अण्णांनी ची सूचना मांडली की आमच्या गावात ४०-४५ एकर गायरान जमीन आहे. अशी बरीच गायरान जमिनी आहेत त्या शासनाच्या जमिनी आहेत त्या शासनाच्या माध्यमातून वृक्ष लागवडीसाठी उपलब्ध होतील दुसरा फायदा असा होईल की या भागात फळ पिके मोठ्या प्रमाणात शेतकरी घेत होती मोसंबी सारखी पिके शेतकरी घेत होती पण पाणी नसल्यामुळे येथील सर्व फळबागा आता नाहीशा झाल्या आहेत या योजनेमुळे येथे फळबाग होईल उसाची लागवड करता येईल पर्यायाने जनावरे देखील शेतकरी सांभाळू लागतील पर्यायाने दुग्ध व्यवसाय वाढीस लागेल जनावरांचे कंपोस्ट खत उपलब्ध

होईल आणि शेतीचा पोत सुधारण्यास मदत होईल पाणी नसल्यामुळे या समस्या शेतकऱ्यांसमोर उभे आहेत कुणाचे जनावर पाणी पिण्यासाठी आले तर तो शेतकरी खाली वर बघायचा कारण हौदातील पाणी संपले तर करायचे काय पाऊस पडला म्हणून आजची परिस्थिती जरा बरी आहे म्हणून ही योजना अत्यंत उपयुक्त आहे म्हणून आम्ही शासनासोबत आहोत येथील शेतकरी कष्टाळू आहेत बारा महिने पाणी उपलब्ध नसल्यामुळे हे शेतकरी पाठीमागे आहेत एक पिकाची शेती या ठिकाणी होत आहे हे जर पाणी आले तर बारामाही शेती होईल उसाची लागवड करण्यात येईल फळबाग होईल पर्यायाने शेतकऱ्यांचे जीवन समृद्ध होईल म्हणून ही योजना आमच्या भागाकरिता अत्यंत महत्त्वाचे आहे म्हणून आपण पुढील कार्यवाही लवकरात लवकर करावी या योजनेपासून कुठलाही पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही त्यामुळे आपण जनतेच्या बाजूने कौल द्यावा याबाबत मी याठिकाणी विनंती करतो धन्यवाद

**५. श्री हरिश्चंद्र भाऊसाहेब नेहरकर माजी सरपंच येसगाव-**

हि योजना ४० गावासाठी खूप महत्त्वाची योजना आहे या गावासाठी कुठलाही पाण्याचा सोर्स उपलब्ध नाही त्यामुळे या योजनेचा या गावांसाठी खूप मोठा फायदा होणार आहे प्रत्येक शेतकरी सुजलाम-सुफलाम होणार आहे आणि या योजनेपासून पर्यावरणाला कुठलीही हानी पोचणार नाही ही एक महत्त्वाची बाब आहे म्हणून आमदार साहेबांनी ही जी योजना आमच्यासाठी आणली त्याबद्दल मी आमदार साहेबांचे खूप खूप धन्यवाद देतो प्रत्येक गावामध्ये गायरान जमीन आहे ती वृक्ष लागवडीसाठी वापरता येईल.

**६. श्री अर्जुन किसन पवार, कनकोरी -**

साठ-सत्तर एकर गायरान मध्ये झाडे लावावीत गायरान कित्येक दिवसापासून पडलेले आहे यामध्ये झाडे लावल्याने शेतकरी व गावकरी यांचा फायदा होईल हीच एकमेव माझी सूचना येथे मी मांडू इच्छितो.

**७. श्री चंद्रकांत सांडु गवळी, गवळी शिवरा -**

माझी सूचना अशी आहे की आमच्या गवळीशिवरा ग्रामपंचायतीने आतापर्यंत ५० हेक्टरमध्ये बहुगुनी झाडे लावली आहेत बहुगुणी असे झाड आहे की ते १०० फुटापर्यंत त्याची उंची वाढते आमच्या गावांमध्ये शंभर एकरामध्ये बहुगुणी झाडां बाबत प्रस्ताव आम्ही शासनाकडे पाठवला आहे यापासून पर्यावरणाचे संतुलन चांगल्याप्रकारे राहते शेतकऱ्यांना त्याचा फायदा देखील चांगल्या प्रकारे होतो असे प्रस्ताव कित्येक गावाने किंवा ग्रामपंचायतीने केले तर त्याचा पर्यावरणाला फायदा होईल तसेच प्रत्येक शेतकऱ्यांनी २० गुंठ्यांमध्ये ही

झाडे लावली तर देखील त्याचा देखील खूप मोठा फायदा होणार आहे या ४० गावांमध्ये कायम दुष्काळी भाग आहे त्यामुळे ही योजना जर झाली तर शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर फायदा होणार आहे त्यामुळे शासनाकडे या योजनेचा प्रस्ताव तात्काळ पाठविण्याबाबत याठिकाणी मी विनंती करतो तसेच तेथे पूर्वी मोसंबीची खूप फळबागा या ठिकाणी होत्या आता पाण्याअभावी येथे काहीच राहिले नाही त्यामुळे सदर योजना तात्काळ कार्यान्वित व्हावी एवढीच इच्छा आहे.

**८. श्रीमती अलका भारत कीर्ती शाही, सरपंच, गवळी शिवरा यांनी असे नमुद केले कि -**

प्रथमतः आम्ही जेव्हा आलो होतो तेव्हा बरेचसे प्रश्न आमच्या डोक्यात येऊन घेऊन आलो होतो कारण या योजनेविषयी आमच्या मनामध्ये बरेच प्रश्न होते ते असे खड्डे करणार तर मातीचे काय करणार परंतु जे प्रश्न होते व त्याची उत्तरे तुम्ही दिलेली आहेत त्यामुळे आमच्याकडे प्रश्नच नाही कारण महिला प्रतिनिधी म्हणून सांगते की पाणी नसल्यामुळे जास्तीत जास्त त्रास महिलांना होतो कारण दरवर्षी टँकर आणि टँकरने पाणी किती येणार. त्यामुळे ही योजना जर आली तर पाण्याचा आम्हाला चांगलाच फायदा होईल या योजनेतून शेतकऱ्यांचा मोठ्या प्रमाणात फायदा होईल शेतकऱ्यांना पाणी नाही रोजगार नाही रोजगार नसल्याने वीज बिल अभावी लाईट कट झाली आहे पैसेच नाही तर बिल भरायचे कुठून आता यावर्षी पाऊस झाला आहे पाणी आहे पण वीज नाही त्यामुळे ते पैसे भरू शकत नाही आणि या योजनेचा जर फायदा झाला तर शेतकरी चांगला होईल जेणेकरून तू कर्ज ही फिरू शकेल ही योजना झाली तर आमच्यासारख्या महिलांना खूप याचा फायदा होईल आणि माझी एक शंका होती की आपण जी झाडे लावणार आहात ते सांभाळणार कोण?

**यावर प्रकल्प प्रवर्तक श्री धनंजय गोडसे, कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र.१ यांनी सांगितले कि -**

ताई आपण जो प्रश्न उपस्थित केलेला आहे सध्या जलसंपदा विभागाच्या वतीने वृक्ष लागवड करणे आणि त्याचे संगोपन करणे अशी दोन्ही योजना एकत्रितपणे राबविली जाते आता ज्या वेळेला हा प्रकल्प सुरू होईल आणि आपल्या माध्यमातून आम्हाला जी जमीन उपलब्ध होईल त्या ठिकाणी आम्ही फक्त वृक्षलागवड करणार नाही तर येणाऱ्या तीन वर्षापर्यंत आम्ही त्याचे संगोपन देखील करणार आहोत आणि त्यानंतर हेच झाडांचे संगोपन त्याच्या ग्रामपंचायतीने करायचे आहे.

**यावर श्रीमती अलका कीर्ती शाही, यांनी नमुद केले कि –**

त्यामुळे आमची या प्रकल्पाला पूर्ण संमती आहे लवकरात लवकर हा प्रकल्प व्हावा हीच आमची इच्छा आहे.

**९. दशरथ भाऊ शेलार, गवळी शिवरा –**

सदर व्यक्तीचे बोलणे न समजल्याने माहिती निरंक ठेवण्यात येत आहे तथापी शारीरिक हावभावावरुन त्यांचा प्रकल्पास पाठिंबा असल्याचे दिसुन आले.

**१०. श्री देविदास बनकर, अंबेलोहळ यांनी सूचना केली कि –**

मी सर्वप्रथम महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे आभार मानतो आणि माननीय आमदार साहेबांचे देखील आभार मानतो की त्यांनी या ठिकाणी ही योजना आणली आहे प्रदूषण याठिकाणी वाढत आहे आणि जमिनीचा पोत का लावतोय आणि पशुपक्षी व जैवविविधता ही कमी होत आहे तर पाणी हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा या ठिकाणी आहे पहिला मुद्दा असा की पाणी नसल्यामुळे या मराठवाडा मध्ये एकच पीक त्यांच्या हातामध्ये असते पाणी नसल्यामुळे जेवढे खत टाकता येईल तेवढे ते टाकत असतात त्यामध्ये केमिकल फर्टिलायझर्स यांचा वापर ते मोठ्या प्रमाणात करतात आणि त्या माध्यमातून जास्तीत जास्त पीक कसे घेता येईल याचा विचार ते करतात जास्तीत जास्त खतम वापरल्याने जमिनीचा पोत खालावतो आणि प्रदूषण वाढत जाते जर पाणी असेल तर जास्तीत जास्त खत फवारणी याच्याकडे ते दुर्लक्ष करतील हे जर पीक नाही तर पुढील पीक आपल्याला घेता येईल असा दृष्टीकोन असेल आणि म्हणून जमिनीचा पोत कसा सुधारता येईल याकडे ते लक्ष देतील सेंद्रिय शेतीकडे शेतकऱ्यांचा कल वाढावा व त्यास प्रोत्साहन मिळावे जर हे झालं नाही तर महाराष्ट्राचा पंजाब कसा होईल याला वेळ लागणार नाही त्यामुळे आपल्याकडे पाणी जर आले तर जास्तीत जास्त लोक जनावर पाळतील आता एक बंधू या ठिकाणी बोलले होते की माणसाला जगायला या ठिकाणी पाणी नाही तर जनावरांना पाणी कुठून आणायचं. शेती हा आपला व्यवसाय कुणाचाच नाही आपला प्राथमिक व्यवसाय जो होता गाई पालन आणि त्याच्यापासून सेंद्रिय खत मिळायचे आणि जमिनीचा पोत वाढायचा त्यामुळे कोणतीही फवारणी न करता पीक चांगली यायची कालांतराने काय झालं आपला हा भाग दुष्काळग्रस्त भाग होत गेला त्यामुळे लोकांचा पीक घेण्याचा कल बिघडला म्हणजेच कमी होत गेला पाणी कमी पडल्यामुळे आपल्याकडची जनावरे नष्ट होत गेली गाई आपल्याकडे राहिल्या नाहीत शेण व गोमूत्र आपल्याकडे नसल्याने आपण फर्टिलायझर्स वापर करू लागलो आणि आपल्या जमिनीचा पोत बिघडत गेला.

म्हणजेच या प्रोजेक्टमुळे जर पाणी आले आपल्याकडे शेती व्यवसाय वाढेल जनावरांचे प्रमाण वाढेल व त्याचा फायदा या परिसरातील ४० गावांना होणार आहे आणि प्रदूषण नक्कीच कमी होईल.

**११. श्री संतोष पाटील जाधव माजी बांधकाम सभापती तालुका गंगापूर यांनी नमुद केले कि -**

आजचा लोक सुनावणी मध्ये पर्यावरणाची मान्यतेचा प्रस्ताव शासनाला सादर करायचा आहे यासाठी प्रस्तावाच्या समर्थनार्थ ४० गावाच्या लोकांनी हात वर करून समर्थन द्यावे.

त्यानंतर प्रकल्पाच्या समर्थनार्थ सर्वांनी हात वर करून समर्थन दिले.

त्यानंतर विरोध दर्शविण्यासाठी लोकांचा कल घेण्यात आला परंतु कुणीही विरोध दर्शविला नाही.

**१२. मा. अध्यक्षांच्या परवानगीने मा. आमदार प्रशांतजी बंब यांनी नमुद केले कि -**

नमस्कार सर्व संत-महंत महापुरुष यांना माझे कोटी कोटी वंदन.... आज आपली एन्व्हायरमेंटल क्लिअरन्स साठी ची ही पब्लिक hearing आयोजित केली आहे आणि त्या अनुषंगाने मी येथे उपस्थित सर्व अधिकाऱ्यांना विनंती करतो की आपण सर्व लोकांच्या भावना या ठिकाणी येथे समजून घेतले आहे खरं म्हणजे हा प्रकल्प आहे हा पर्यावरणाला पूरक असा प्रकल्प आहे पर्यावरण याच्यामुळे चांगले होणार आहे याचे कारण दोन तीन आहेत त्याबाबत मी जो आतापर्यंत अभ्यास केलेला आहे त्यामध्ये पहिली गोष्ट अशी आहे की कोणतेही धरण आम्ही येथे बांधत नाहीत ज्याला पर्यावरणाची हानी होईल. २) या प्रकल्पासाठी पंपावर च्या जमिनी व्यतिरिक्त एकही शेतकऱ्यांची जमीन आम्ही संपादित करणार नाही कारण आम्हाला शेती करायची आहे आम्ही शेती पासून परावृत्त होऊन शेती विकण्याच्या मार्गावर का आलो होतो कारण आम्हाला शेतीसाठी पाणी आणि वीज लवकर मिळत नव्हती कारण आज आमचा सौभाग्याचा दिवस आहे जेव्हा आपण खरेदी करायला जमीन-जुमला आपण बघतो तर आपण मोजणी करतो त्याची पेपरला जाहिरात देतो जाहीर प्रकटन करतो कुणाचे ऑब्जेक्शन किंवा सजेशन असेल तर ते मागवतो नंतर आपण ईसार पावती करतो नंतर आज आम्हाला सर्व गोष्टीची पूर्तता झाल्यानंतर आज आमचा इसार पावती चा दिवस आहे म्हणजेच हा आज जनसुनावणी चा दिवस आहे.

या योजनेमध्ये क्लस्टरचा आहेत म्हणजे एक हजार एकर चे जवळपास तीस क्लस्टर यांचे त्याच्यामध्ये आम्ही नियोजित केले आहेत. ३० टक्के वाढ कशी होईल याचा अनुषंगाने हा प्रकल्प आम्ही घेतलेला आहे मी पर्यावरण अधिकाऱ्यांनाही सांगू इच्छितो की हा प्रकल्प पर्यावरणाला पूरक असा प्रकल्प आहे तर याची value added chain होणार आहे शेतकरी महोदयांना प्रत्येक गोष्ट पर्यावरणाचा पूरक घेऊन हा प्रकल्प

केलेला आहे. मी जेव्हा दिल्लीला याबाबत चर्चा केली पर्यावरणाच्या बाबतीत तेव्हा त्यांनी हे सांगितले की प्रत्यक्ष हा प्रकल्प जर तुम्ही जमिनीवर उतरवला तर खरोखर देशाचे अधिकारी व नेते हा प्रकल्प बघायला येतील आणि मला सांगायला आनंद वाटतो की जवळपास ७५ टक्के पूर्तता या ठिकाणी झालेली आहे पर्यावरणाची ही शेवटची बाब आहे आम्ही शेतकऱ्यांनी काय पथ्य पाळले आहे की ही परवानगी कशाला घ्यायची किंवा अमुक गोष्ट का करायची अशी एकही परवानगी आम्ही सोडली नाही सगळ्या परवानगी आम्ही घेतल्या प्रकल्पाला उशीर का लागला तर आम्ही बघत होतो की कित्येक वर्षापासून प्रकल्प चालू असलेले रखडले गेले आहेत बरेच प्रकल्पामध्ये जनसुनावणी घेतल्या गेल्या नव्हत्या किंवा बऱ्याच परवानग्या राहून गेलेल्या होत्या त्यामुळे सर्वांनाच त्याचा नुकसान सहन करावे लागते आणि त्याचा अप्रत्यक्ष रित्या माणसांवर त्याचा फरक पडतो तर आम्ही सगळ्या परवानग्या सगळ्या पर्यावरणाशी निगडित असलेल्या परवानग्या शासनाच्या परवानग्या ज्याला आपण म्हणूयात एम डब्ल्यू आर आर ए च्या सर्व परवानग्या आपण अगोदर घेतलेल्या आहेत काही परवानग्या न घेता काही प्रोजेक्ट झाले होते ते नंतर रद्द करावे लागले ते थांबले आणि आम्ही त्याची सुद्धा परवानगी घेतली आहे. आणि ती परवानगी मोघम स्वरूपाची नाही घेतली त्यांच्याकडून सुद्धा पर्यावरणाची परवानगी जर तुम्ही घेतली तर आमची परवानगी तुम्हाला आहेच या कंडीशन वर घेतलेली आहे म्हणजे त्यातील एक पूर्तता आपण केलेली आहे बऱ्याच गोष्टी येते बोलण्यासारखे आहेत आज खरं म्हणजे  या पेंडॉल मध्ये आम्ही तीनशे-चारशे शेतकरी बसून पर्यावरण विषयक काही बाजू याठिकाणी मांडले असतील आणि माझ्यात आईने देखील बरेच भावना चांगल्या रीतीने येथे मांडल्या तुम्ही बघितलेच की आम्ही कृषीविषयक लक्ष ठेवतोय झाडांची लक्ष ठेवतोय, पर्यावरण विषयक आम्ही लक्ष ठेवतय खरं म्हणजे हा ऐतिहासिक दिवस आहे कारण ही परवानगी सहसा मिळत नसते कारण लोकांचे बरेचसे ऑब्जेक्शन यामध्ये असतात.

आपण जर आम्हाला या परवानग्या दिल्या तर साधारणतः फेब्रुवारी-मार्चमध्ये आमची ऍडमिनिस्ट्रेटिव्ह अॅप्रोवल पूर्ण होऊन कारण आमच्या सीडीओ मध्ये आमच्या शेवटच्या परवानगी साठी तुमची परवानगी मिळाल्यानंतर आम्हाला देते जावे लागते. ९५ टक्के परवानगी पूर्ण झाले आहेत त्यामुळे मार्च-एप्रिलमध्ये आमचे टेंडर फ्लोट होऊन प्रत्यक्ष पावसाळ्यात किंवा पावसाळ्यानंतर या कामाला सुरुवात करू शकतो कारण की सर्व अधिकारी महोदयांना आम्ही शेतकऱ्या मार्फत हे सांगू इच्छितो की खरोखर आम्ही कित्येक दशकापासून वंचित आहोत कारण जायकवाडी आमच्या उशाला आहे परंतु आम्हाला आजपर्यंत फायदा झाला नाही असो.... अधिकाऱ्यांना मी पुन्हा एकदा विनंती करतो की या परवानग्या आम्हाला लवकरात लवकर देऊन शेवटची प्रक्रिया पार पाडण्याकरिता आपण आम्हाला मदत करावी धन्यवाद.

**१३. श्री संतोष पाटील जाधव माजी बांधकाम सभापती तालुका गंगापूर यांनी नमुद केले कि -** धन्यवाद आमदार साहेब... गंगापुर तालुक्यातील या चाळीसगाव यांच्या समस्यांबाबत आपण सविस्तर मार्गदर्शन केले त्याबद्दल आपले धन्यवाद यानंतर ज्यांची खरी जबाबदारी आहे त्यांनी आमच्या भावनेची कदर करून आम्हाला आपल्या निर्णयाचा थोडातरी अंदाज देण्यात यावा ही विनंती..

त्यानंतर प्रकल्पाच्या समर्थनार्थ लिखित स्वरूपातील एकूण १९ निवेदने शेतकरी गावकरी यांच्यामार्फत देण्यात आली व श्री गव्हाणे साहेबांनी मार्गदर्शन करणे बाबत त्यांना विनंती करण्यात आली.

**मा. अध्यक्ष, तथा अप्पर जिल्हाधिकारी औरंगाबाद श्री अनंत गव्हाणे साहेब यांनी अध्यक्षीय समारोपात असे नमुद केले कि –**

आम्ही यामध्ये मार्गदर्शन करतच नसतो आम्ही समारोप करतो मी ( दरम्यान निवेदने स्वीकारण्यात आली) आज या ठिकाणी परिसरातले सर्व शेतकरी उपस्थित राहिले माननीय आमदार महोदय स्वतः या ठिकाणी हजर राहिले व त्यांनी ही आपले मनोगत या ठिकाणी व्यक्त केले विरोध हा कोणी जनसुनावणी मध्ये दर्शविला नाही बहुतेक लोकांना हा प्रकल्प हवाच अशा भावना येथे आम्हाला दिसून आल्या लेखी निवेदन या ठिकाणी आलेले आहेत आपण तोंडी जे निवेदन दिलेली आहेत त्याचीही नोंद आम्ही या ठिकाणी घेतलेली आहे त्याचेही आम्ही प्रोसिडिंग मध्ये समावेश करू आपली लेखी निवेदने जी दिलेले आहेत त्या लेखी निवेदनासाठी चा देखील आम्ही अभ्यास करून त्याच्या संबंधीची आमचे निष्कर्ष जे आहेत ते पण सीडींच्या पार्ट मध्ये आम्ही नोंदवून अर्थात आमचा अहवाल गोपनीय स्वरूपाचा असतो पण एकंदर लोक भावना ज्या आहेत त्या या प्रकल्पाला पॉझिटिव्ह आहेत मराठवाड्याच्या प्रदेशांमध्ये मी मराठवाड्याचा आहे त्यामुळे असे प्रकल्प मराठवाड्यामध्ये झाले पाहिजेत या मताचा मी आहे मुंबईत जी कमिटी आहे तिकडे आपण हा अहवाल पाठवतो त्या ठिकाणच्या सुनावणीनंतर यासंबंधीचे निर्णय होतात जर आज या ठिकाणी आपण अतिशय शांतपणे व अतिशय सक्रिय पद्धतीने या सभेमध्ये आपला सहभाग नोंदवला आपली या प्रकल्पाच्या संबंधित मत आम्हाला ऐकलीत, कृषी विभागाला आपण सोबत घेतले पाहिजे कावळे नाहीत असे एका भगिनीने मांडले म्हणजे फॉरेस्ट विभागाचा यामध्ये सहभाग घेऊन यामध्ये आपल्याला काही वेगळे करता येईल काय आणि एक असा मोठा प्रकल्प उभा राहिल्यावर त्याला जोडून अजून पर्यावरण पूरक आणि ज्या लोकांना हव्यात अशा काही चांगल्या गोष्टी अमलात का देता आल्या तर हा प्रकल्प तुमचा जो आराखडा आहे त्या पुरता सीमित न राहता त्याच्या पलीकडे एक पाऊल जाऊन त्यांनी काम करावं असा दृष्टीकोन आपण ठेवावा एवढी विनंती मी या जिल्ह्याचा अधिकारी आणि मराठवाड्याचा नागरिक म्हणून आपल्याला विनंती

करतो आहे माझे दोन्ही सहकारी यांचे देखील आभार या ठिकाणी व्यक्त करतो आपण सर्वजण याठिकाणी उपस्थित राहिलात त्याबद्दल मी आपले आभार व्यक्त करतो धन्यवाद.

डॉ. राजेश औटी, क्षेत्र अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांनी जनसुनावणी समितीची व उपस्थित असलेल्या ग्रामस्थांचे तसेच प्रकल्प प्रतिनीधी व उपस्थित आमदार महोदयांचे जाहिर आभार मानले व मा. अध्यक्षांच्या परवानगीने सदरील पर्यावरण विषयक जनसुनावणीचे कामकाज संपन्न झाल्याचे घोषीत केले.

**(प्रदिप वानखेडे)**
समन्वयक,
पर्यावरणविषयकजाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि.मंडळ, औरंगाबाद

**(डॉ. प्रवीण म. जोशी)**
सदस्य,
पर्यावरणविषयकजाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ,
औरंगाबाद

**(डॉ. अनंत गव्हाणे)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी-औरंगाबाद, जिल्हा-औरंगाबाद